| पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.<br>करआकारणी व करसंकलन विभाग | |
|---|---|
| परिपत्रक स्वरुप | शैक्षणिक इमारतींना मालमत्ता करामध्ये सवलत देणे बाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/९/कावि/९६० /२०२२, दिनांक ०७ / ०६/२०२२ |
| विषय : | शैक्षणिक संस्थांच्या मालमत्तेमध्ये कंपोस्टींग यंत्रणा, झिरो वेस्ट संकल्पना, रेनवॉटर हार्वेस्टींग व सौरउर्जा प्रकल्प राबविल्यास सामान्य करामध्ये सवलत देणेबाबत |
| अंमलबजावणी कालावधी | स्थायी |
| कोणाच्या माहितीसाठी / कार्यवाहीसाठी | १) मिळकत कर आकारणी, तसेच वसूली करणारे सर्व अधिकारी / कर्मचारी<br>२) स्वच्छ महाराष्ट्र / भारत अभियान (नागरी) प्रकल्प अंमलबजावणी कक्ष |
| संदर्भ | १) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२७, १२९ व १४०<br>२) मा. प्रशासक यांचेकडील मा.महापालिका सभा ठराव क्र.५१ दि.१०/०५/२०२२ |

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहरातील इमारती व जमिनीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १२७ व १२९ नुसार कर आकारणी करणेत येते. तसेच कलम १४० नुसार मालमत्ताकरामध्ये सूट / सवलत देणेबाबत तरतूद आहे. त्यानुसार मालमत्ताधारकांनी विहित वेळेत कराचा भरणा करावा यासाठी विविध प्रोत्साहनपर करसवलती महापालिकेमार्फत दिलेल्या आहेत.

शैक्षणिक संस्थां विद्यार्थ्यांना शिक्षण देणे बरोबर संस्कारक्षम करणेचे कार्य करतात. या विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग संवर्धन, कचरा समस्या, पर्यावरण संतूलन बाबत जागरुकता वाढेल व पर्यायाने शहर स्वच्छ व सुंदर होण्यास मदत होईल, याचा विचार करता ज्या शैक्षणिक संस्थांमध्ये किमान १० वी पर्यंत शैक्षणिक अभ्यासक्रम शिकविला जातो अशा संस्थांचे मालमत्तांना सामान्य करात सवलत देणे आवश्यक आहे.

सबब मा.प्रशासक यांचे संदर्भ क्र.२ चे मंजूर ठरावाचे अनुषंगाने ज्या शैक्षणिक संस्थेमध्ये किमान १० वी पर्यंतचा शैक्षणिक अभ्यासक्रम शिकवला जातो, अशा शैक्षणिक संस्थांचे मालमत्तेस खालील नमूद प्रमाणे सवलत देणेत येत आहे.

| क्र. | निकष | सामान्य करात सवलत |
|---|---|---|
| १ | ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा कार्यान्वीत असल्यास (ओला कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या) | ४% |
| २ | झिरो वेस्ट संकल्पना राबविणेत येत असलेस (ओला व सुका कचरा पुर्णत: जिरविणाऱ्या) | ७% |
| ३ | झिरो वेस्ट + रेनवॉटर हार्वेस्टींग प्रकल्प कार्यान्वीत असलेस | ८% |
| ४ | झिरो वेस्ट + सौरउर्जा प्रकल्प कार्यान्वीत असलेस | ९% |
| ५ | झिरो वेस्ट + रेनवॉटर हार्वेस्टींग + सौरउर्जा प्रकल्प कार्यान्वीत असलेस | १०% |

मालमत्ता कराचे सामान्य करातील वरील सवलती कामी अटी/शर्ती खालील प्रमाणे

१) ज्या शैक्षणिक संस्थांमध्ये किमान पहिली ते दहावी पर्यंत शिक्षणाची सोय उपलब्ध आहे, अशा संस्थांचे मालमत्तेस उक्त निकषानुसार त्याचे पुढे नमूद सामान्य कर सवलतीचा लाभ देय राहिल.

२) शैक्षणिक संस्था नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

३) ज्या पात्र निकषांनुसार सवलत मिळणेबाबतचा अर्ज दाखल आहे. त्याबाबत संबंधित कार्यक्षेत्रातील क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील सदर यंत्रणा कार्यान्वीत असलेबाबतचा दाखला आवश्यक आहे. सदर दाखला करसंकलन विभागीय कार्यालयाकडे प्राप्त झालेनंतर सवलत देण्यात येईल.

(नीलेश देशमुख)

मा.आयुक्तसो. यांचे मान्यतेने

सहा. आयुक्त, करसंकलन,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) सर्व करसंकलन विभागीय कार्यालय/गट प्रमुख/ गटलिपिक

२) सर्व क्षेत्रीय कार्यालये ३) लेखा विभाग ४)मुलेप विभाग

५) संगणक विभाग ६) टेक नाईन सर्व्हीसेस प्रा.लि.

७) स्वच्छ महाराष्ट्र / भारत अभियान (नागरी) प्रकल्प अंमलबजावणी कक्ष